# प्रेसनोट दिनांक ०६/०४/२०१९

**खडक पोलीस स्टेशन कडील सराईत गुंड नामे- अजय संजय जाधव यास एम.पी.डी.ए कायद्यातंर्गत येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे येथे स्थानबध्द केले बाबत...**

आगामी लोकसभा निवडणूक २०१९ ही पुणे शहरात निर्विघ्न व शांततेत पार पाडणे कामी व पुणे शहरातील वाढत्या गुन्हेगारी कृत्यांना आळा बसविण्याकरिता मा.व्यंकटेशम, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी कडक पावले उचलली असून त्यासाठी पुणे शहरातील सराईत गुन्हेगारावर प्रभावी कारवाई करण्याचे आदेश पुणे शहरातील सर्व वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना दिलेले होते.

त्याप्रमाणे खडक पोलीस स्टेशन पुणे चा गुन्हे अभिलेखावरील सराईत व अटट्ल गुन्हेगार नामे- **अजय संजय जाधव वय- ३२ वर्षे रा. ६११, कासेवाडी पोलीस चौकी जवळ, कासेवाडी, भवानीपेठ, पुणे.** याचे विरुध्द खडक पोलीस स्टेशन येथे सन २००८ पासून खंडणी मागणे, मारामारी करणे, घातक हत्यारे जवळ बाळगणे, जबरी चोरी करणे, धमकी देणे, सामान्य नागरिकाना विनाकारण मारहाण करणे यासारखे एकूण ०६ गुन्हे दाखल आहेत. स्थानबदध इसमाचे वाढते गुन्हेगारी कारवाईना आळा घालणे साठी सन २०१७ साली त्यास २ वर्षा करिता तडीपार ही करण्यात आलेले होते. स्थानबदध इसमाविरूदध तडीपार आदेशाचा भंग केले बाबत ६ गुन्हे दाखल आहेत. स्थानबध्द इसमास तडीपार करूनही त्याच्या गुन्हेगारी वर्तनात काही एक सुधारणा झालेली नव्हती.

नमुद सराईत गुंड व स्थानबध्द इसम नामे- **अजय संजय जाधव वय- ३२ वर्षे रा. ६११, कासेवाडी पोलीस चौकी जवळ, कासेवाडी, भवानीपेठ, पुणे.** याचेविरुध्द वेळोवेळी प्रतिबंधक कारवाई करुनही त्याचे वागणुकीत काहीएक फरक पडलेला नव्हता. तो अत्यंत क्रुर, खुनशी व भांडखोर असुन तो लोकांमध्ये काहीना काही कुरापती काढुन मारहाण करुन गंभीर स्वरुपाचे गुन्हे करीत आहे. तेथ्ील व्यापा-यांना व बिल्डर ना खंडणी मागणे, सर्वसामान्य, शांतताप्रिय नागरीकांना विनाकारण त्रास देवुन आपला गुन्हेगारी हेतु साध्य करीत आहे. तसेच बेकायदेशीर घातक शस्त्र जवळ बाळगून लोंकामध्ये दहशत निर्माण केली आहे. त्याचे दहशतीमुळे व भितीपोटी त्याचेविरुध्द तक्रार देण्यास कोणीही पुढे येत नव्हते. त्याचे अशा कृत्यामुळे सर्वसामान्य नागरीकांचे मनात भिती निर्माण होवुन त्यांचे जिवीतास व मालमत्तेस धोका निर्माण झाला होता. म्हणुन श्री. राजेंन्द्र मोकाशी खडक पोलीस स्टेशन, पुणे शहर यांचे मार्गदर्शना खाली श्री. उत्तम चक्रेपोलीस निरीक्षक (गुन्हे) यांनी त्यास स्थानबदध करणे बाबत चा प्रस्ताव मा. पोलीस आयुक्त सो, पुणे शहर यांना सादर केला होता. सदर प्रस्तावाचे अवलोकन करून मा. पोलीस आयुक्त सो पुणे शहर यांनी दि ०५/०४/२०१९ रोजी येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे येथे स्थानबदध करण्याचे आदेश दिले. त्याप्रमाणे खडक पोलीस स्टेशन कडून स्थानबदध इसमास येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे. येथे स्थानबध्द करण्यात आले आहे.

**चालू वर्षामध्ये खडक पोलीस स्टेशन कडून दुस-यांदा सराईत गुन्हेगारावर एम.पी.डी.ए कायदया अंतर्गत मोठी कारवाई केल्याने परिसरातील सर्वसामान्य नागरिकांचा पोलीसांवरील विश्वास वाढला आहे.**

सराईत गुन्हेगारा कडून अशा प्रकारे आगामी लोकसभा व विधानसभा निवडणूक, सण व उत्सव काळात कोणताही अनुचीत प्रकार घडु नये या अनुषंगाने पोलीसांकडुन समाजकंटक व अटट्ल गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात आले असुन त्यांचेविरुध्द कठोर कारवाई करण्याचे संकेत पोलीसांनी दिले आहेत.

सदर कारवाई मा. रविन्द्र सेनगावकर अपर पोलीस आयुक्त, पश्चिम विभाग, पुणे शहर , मा. सुहास बावचे पोलीस उप आयुक्त, परि-१ पुणे मा. प्रदिप आफळे, सहाय्यक पोलीस आयुक्त फरासखाना विभाग यांचे मार्गदर्शना खाली श्री. राजेंन्द्र मोकाशी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, खडक पोलीस स्टेशन, पुणे श्री. उत्तम चक्रे पोलीस निरीक्षक (गुन्हे) पोलीस उप निरीक्षक रत्नदीप गायकवाड, महेश बारवकर, महेश कांबळे, दिपक मोधे यांनी सदर कारवाई मध्ये भाग घेवुन प्रस्ताव तयार केलेला आहे.

**वरीष्ठ पोलीस निरीक्षक**
**खडक पोलीस स्टेशन पुणे शहर**